॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
बुद्धीपेक्षा युक्ती श्रेष्ठ

■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. २ जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ९ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## SPOT NEWS

### मान्सूनची अनुकूल स्थिती: पुढील ४८ तासांत केरळमध्ये

● **पुणे** – भारतीय हवामान विभागाने दिलेल्या ताज्या अंदाजानुसार, नैऋत्य मोसमी वारे अर्थात मान्सूनच्या पुढील ४८ तासांत केरळमध्ये आगमनासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. दक्षिण अरबी समुद्र आणि लगतच्या भागात मान्सूनची प्रगती सुरू असून, येत्या दोन ते तीन दिवसांत तो केरळमध्ये अधिकृतपणे धडकण्याची दाट शक्यता आहे. केरळमध्ये मान्सून दाखल झाल्यानंतर साधारणपणे दहा ते बारा दिवसांच्या कालावधीत तो महाराष्ट्रात पोहोचतो. त्यानुसार, जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात म्हणजेच १० ते ११ जून दरम्यान मान्सून महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर आगमन करेल असा प्राथमिक अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन होण्यापूर्वीच राज्यात मान्सूनपूर्व पावसाची हालचाल दिसून येत आहे. सध्या राज्याच्या विविध भागांत, विशेषतः विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा दिला असून, काही ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्याचा वेग ताशी ४० ते ६० किलोमीटरपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. या पावसामुळे तापमानात २ ते ४ अंशांची घट होण्याची अपेक्षा आहे.

### नीट पुनर्परीक्षा आनलाईन घेण्यास सर्वोच्च न्यायालयाचा विरोध

● **नवी दिल्ली** – सर्वोच्च न्यायालयाने २१ जून रोजी होणारी नीट पुनर्परीक्षा कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट मोडमध्ये घेण्याची मागणी फेटाळून लावली. न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी जुलैमध्ये निश्चित केली आहे. त्यामुळे २१ जून रोजी होणारी परीक्षा सध्या पेन-पेपर मोडमध्येच होईल. न्यायमूर्ती पीएस नरसिम्हा आणि न्यायमूर्ती अरविंद कुमार यांचे खंडपीठ आरजेडी खासदार सुधाकर सिंह यांच्या याचिकेवर सुनावणी करत होते. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी नीटची पुन्हा परीक्षा CBI मोडमध्ये घेण्याची मागणी केली. देशभरात ३ मे रोजी नीट-पीजी परीक्षा झाली होती. ७ मे रोजी संध्याकाळी पेपरफुटीची बातमी समोर आली होती. १२ मे रोजी परीक्षा रद्द करण्यात आली.

# विधान परिषदेसाठी तनपुरे विरुद्ध काँग्रेसचे ससाणे अपक्ष

## भाजपाकडून प्राजक्त तनपुरे यांचा अर्ज दाखल । करण ससाणेसह चार अपक्षांनी भरले अर्ज

● **अहिल्यानगर । वीरभूमी** – नगर विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपकडून माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. महाविकास आघाडीकडून अधिकृतपणे एकही अर्ज दाखल झालेला नाही. नगरची जागा महायुतीकडून भाजपाला तर मविआकडून काँग्रेसच्या वाट्याला आहे. मात्र मतदारसंघात पक्षिय बलाबल पहाता काँग्रेसने अपक्ष खेळी केली असल्याचे दिसून येत आहे. यामुळे काँग्रेसची उमेदवारी करण ससाणे यांना असतांनाही त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

विधान परिषदेच्या एका जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची सोमवारी अंतिम मुदत होती. अखेरच्या दिवशी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी उमेदवारी अर्ज



दाखल केला. यावेळी आ. मोनिका राजळे, काशिनाथ दाते, विठ्ठल लंघे, अमोल खताळ, अक्षय कर्डिले हे उपस्थित होते.

मात्र राष्ट्रवादी (अजित पवार) चे आमदार संग्राम जगताप व त्यांचे पदाधिकारी मात्र यावेळी अनुपस्थित होते. राष्ट्रवादी जगताप यांचे बंधू माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप यांच्यासाठी उमेदवारी मागत होती. उमेदवारी मिळाली नाही तर वेगळा विचार करू, असा इशारा अहिल्यानगर महापालिकेतील नगरसेवक व जगताप यांचे निकटवर्तीय गणेश भोसले यांनी रविवारी दिला होता. त्यामुळे अहिल्यानगर शहरातील राष्ट्रवादीचे पदाधिकारी अनुपस्थितीत होते का? अशी चर्चा आहे.

तर आज अखेर कमलेश हस्तीमल गांधी, करण जयंत ससाणे, दत्तात्रय भाऊसाहेब पानसरे, धुमाळ मचिंद्र पांडूरंग यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तर प्राजक्त प्रसादराव तनपुरे यांनी भाजपाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. दरम्यान मविआकडून खा. निलेश लंके यांच्या पत्नी माजी जि. प. सदस्या राणी लंके या उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र त्यांनी अर्ज भरला नाही. मात्र चार अपक्षांनी अर्ज भरल्याने अर्ज माघारीनंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

## ८० लाख महिला अपात्र; १४ हजार पुरुषांकडून होणार पैसे वसूल

● **मुंबई । वीरभूमी** – लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी पडताळणीत तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरल्यानंतर त्यांना आतापर्यंत देण्यात आलेली हजारो कोटी रुपयांची मदत परत घेतली जाणार का, असा प्रश्न उपस्थित झाला होता. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सरकारची भूमिका स्पष्ट करत अपात्र ठरलेल्या महिलांकडून कोणतीही रक्कम वसूल केली जाणार नसल्याचं सांगितले. मात्र, योजनेचा गैरफायदा घेणाऱ्या १४ हजार पुरुषांकडून संपूर्ण रक्कम परत घेतली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

महायुती सरकारनं विधानसभा निवडणुकीपूर्वी जून २०२४ मध्ये 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरू केली. या योजनेचा निवडणुकीत महायुतीला मोठा राजकीय लाभ झाल्याचं मानले जाते. सुरुवातीला सुमारे २.४७ कोटी महिलांना दरमहा दिड हजार रुपयांचे मानधन देण्यात येत होते. मात्र सत्तास्थापनेनंतर लाभार्थ्यांच्या पात्रतेची पडताळणी सुरू झाल्यानंतर अनेक महिलांची नावे यादीतून वगळण्यात आली. दरम्यान ८० लाखांचा आकडा केवळ ई-केवायसी न करणाऱ्या महिलांचा नसल्याचे महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी स्पष्ट केलं. त्यांच्या माहितीनुसार, त्यामध्ये ई-केवायसी अपूर्ण असलेल्या महिलांबरोबरच वार्षिक अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या सुमारे ११ ते १२ लाख महिला, ६५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या साडेचार ते पाच लाख महिला, तसेच इतर निकषांमध्ये न बसणाऱ्या लाभार्थ्यांचाही समावेश आहे.

## मोहटादेवी देवस्थानचा पदभार धर्मादाय उपआयुक्त नवनाथ जगताप यांनी स्वीकारला

● **पाथर्डी । वीरभूमी** – महाराष्ट्र शासनाने नुकत्याच केलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमातील दुरुस्तीनुसार व राज्यपालांच्या संमतीनंतर, श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानचा पदभार अहिल्यानगरचे जिल्हा धर्मादाय उपआयुक्त नवनाथ जगताप यांनी नुकताच स्वीकारला. श्री मोहटादेवीचे पूजन करून त्यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला.

याबाबत महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाने अधिसूचना प्रसिद्ध करून राज्यातील महत्त्वाच्या देवस्थानांचे नियमन दिवाणी किंवा जिल्हा न्यायालयांकडून काढून ते धर्मादाय आयुक्तांकडे सोपविण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर नवनाथ जगताप यांनी भाविकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देत देवस्थानचा कारभार विश्वासार्ह व पारदर्शक पद्धतीने चालविण्याचा संकल्प व्यक्त केला. देवस्थानचे नावलौकिक देशभर वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.



नाशिक येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मोहटादेवी गडावर येणाऱ्या भाविकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार व धर्मादाय आयुक्त अमोघ कोलती यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर परिसर विकास कामांना गती देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी मंदिर परिसराची पाहणी केली तसेच दानपेटी मोजदाद प्रक्रियेचा आढावा घेतला.

या प्रसंगी देवस्थानचे विश्वस्त ॲड. विक्रम वाडेकर, बाबासाहेब दहिफळे, शुभम दहिफळे, बाळासाहेब लाहोटी, शशिकांत दहिफळे, राजेंद्र शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, लेखापाल संदीप घुले, तसेच सौ. ममता सुरदुशे (अधीक्षक), विनोद पाटील (निरीक्षक), जिजाबा कुंजीर, श्री कानिफनाथ देवस्थान मढीचे विश्वस्त महादेव कोकाटे आणि देवस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

# एल-निनोच्या पार्श्वभूमीवर पाणी, चारा टंचाई निवारणासाठी यंत्रणा सज्ज ठेवा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । एल-निनो प्रभाव व उपाययोजनांबाबत जिल्हास्तरीय आढावा बैठक संपन्न

● **अहिल्यानगर । वीरभूमी** – एल-निनोच्या संभाव्य प्रभावामुळे आगामी काळात पर्जन्यमानावर परिणाम होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जलस्रोतांचे नियोजन, चाऱ्याची उपलब्धता तसेच संभाव्य पाणीटंचाईच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी आतापासूनच सज्ज राहून प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात एल-निनोचा प्रभाव आणि त्यावर करावयाच्या उपाययोजनांबाबत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

यावेळी उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपजिल्हाधिकारी अनुपकुमार यादव, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधीक्षक अभियंता सुनंदा नरवाडे, नगरपालिका प्रशासन अधिकारी अभिजित हराळे, नायब तहसीलदार भारती घोरपडे उपस्थित होते. तर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह संबंधित यंत्रणांचे प्रमुख अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यातील उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात यावे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्यापूर्वीच आवश्यक उपाययोजना राबवून नागरिकांना दिलासा देण्यावर भर द्यावा. ग्रामीण व शहरी भागातील पाणीपुरवठा योजनांची नियमित तपासणी करून त्या सतत कार्यान्वित राहतील, याची दक्षता घ्यावी.

जिल्ह्यातील उपलब्ध पाणीस्रोतांमधून अनधिकृतपणे पाणी उपसा होणार नाही यासाठी विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांवर शीघ्रगतीने कारवाई करण्यासाठी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेले विशेष पथक स्थापन करून अनधिकृतपणे पाणी उपसा करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन पशुधनासाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध राहणे आवश्यक आहे. यासाठी गाव, मंडळ आणि तालुकास्तरावर सूक्ष्म नियोजन करण्यात यावे. ज्या भागात चाऱ्याची उपलब्धता अधिक आहे, तेथून चारा टंचाई असलेल्या तालुक्यांमध्ये चाऱ्याचा पुरवठा करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी, असे निर्देश त्यांनी दिले.

पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होता कामा नये. प्रत्येक तालुक्यात नियमितपणे पाण्याचे नमुने



तपासण्यात यावेत. पाण्याच्या गुणवत्तेवर सातत्याने लक्ष ठेवून नागरिकांना सुरक्षित व शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. प्रत्येक नगरपालिका क्षेत्रात उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्यात यावे. पाणी वितरणात पारदर्शकता आणि कार्यक्षमता राखून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत कृषी विभाग, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जलसंपदा विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, महावितरण, नगरपरिषद प्रशासन तसेच इतर संबंधित विभागांकडून सद्यस्थितीचा आढावा सादर करण्यात आला. संभाव्य परिस्थिती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, भूजल पातळी, जलस्रोतांची स्थिती, चारा उपलब्धता तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

## SPOT NEWS

### गोदावरी-कृष्णा खोरे कार्यालय स्थलांतराला कर्मचाऱ्यांचा तीव्र विरोध

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत विविध कार्यालयांच्या प्रस्तावित स्थलांतराच्या निर्णयाविरोधात मुळा पाटबंधारे जलसिंचन भवनातील कर्मचाऱ्यांनी कामबंद ठेऊन विरोध दर्शविला आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, अहिल्यानगर शाखेच्या वतीने स्थलांतराला विरोध दर्शविण्यासाठी सोमवारी (दि. १ जून) जलसिंचन भवनासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात जलसंपदा विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच कार्यालयांचे स्थलांतर तातडीने रद्द करण्यात यावे, अशी मागणी करणारे निवेदन मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले. या आंदोलनात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस रावसाहेब निमसे, अध्यक्ष सुभाष तळेकर, उपाध्यक्ष अशोक मासाळ, विजय तोडमल, देविदास पाडेकर, वैशाली बोडखे, मृदुला भोर, उषा देवकाते, गंगासागर उगले, अनिता निकाळजे, अश्विनी कोंडा, शुभांगी लवांडे, पल्लवी सोनवणे, प्रतीक्षा औटी, स्नेहल राऊत, राधा चौधरी, संजीवनी गायकवाड, अश्विनी भगत, दीपा सातपुते, प्रियंका म्हस्के, शिल्पा ताजणे, पल्लवी तोडमल, अश्विनी देवराय, संगीता कार्ले, दीपक गीते, रवींद्र कोडम, रोहित निमसे, प्रसाद कराळे, प्रशांत आठरे, मनोज देशमुख, राजेश जाधव, संतोष गांगर्डे, किशोर गांगर्डे, कृष्णा आंधळे, आदिनाथ कराळे, रवींद्र तवले, दत्ता सावरे, संतोष कासार, पोपट जायभाय, जालिंदर सुपेकर आदींसह जलसंपदा विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जलसंपदा विभागांतर्गत कार्यान्वित असलेल्या सर्व सिंचन महामंडळांच्या कामकाजावर शासन स्तरावरून नियंत्रण ठेवले जाते. महामंडळ स्तरावरील महत्त्वाचे निर्णय शासनाच्या मान्यतेनंतरच निर्गमित होत असतात. मात्र शासन व जलसंपदा विभागाची पूर्वमान्यता न घेता संबंधित महामंडळांकडून विविध कार्यालयांच्या स्थलांतराचे आदेश काढण्यात आल्याची बाब चिंताजनक असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

### निमगाव वाघा येथे अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

निमगाव वाघा (ता. नगर) येथे एकता फाउंडेशन ट्रस्ट आणि भुसारे कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना अहिल्यादेवींच्या जीवनकार्याची माहिती देऊन त्यांच्या विचारांचा आदर्श अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याला व कर्तृत्वाला उजाळा देत समाजातील प्रत्येक घटकासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. यावेळी एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, भुसारे कोचिंग क्लासेसच्या संचालिका सुषमा भुसारे, युवराज भुसारे, बाळू डोंगरे, जयसिंग गायकवाड यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना अहिल्यादेवींच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांची माहिती देण्यात आली. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवा यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन मान्यवरांनी केले.

# ‘संजीवनी’ हा केवळ संस्थांचा समूह नसून एक परिवार

## आमदार विवेकभैया कोल्हे । संजीवनी शैक्षणिक संकुलात आमदार विवेकभैया कोल्हे यांचा सत्कार

● **कोपरगाव । वीरभूमी -**

संजीवनी हा केवळ संस्थांचा समूह नसून एक मोठा परिवार आहे. संजीवनीचे माजी विद्यार्थी आज जगभर विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत, हीच संजीवनी शैक्षणिक संकुलाची खरी ओळख आहे, असे प्रतिपादन नवनिर्वाचित आमदार विवेकभैया कोल्हे यांनी केले.

संजीवनी युनिव्हर्सिटी व संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स यांच्या वतीने आयोजित सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे, संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे, तसेच चिफ टेक्निकल ऑफिसर विजय नायडू यांच्यासह विविध संस्थांचे संचालक, प्राचार्य, डीन, रजिस्ट्रार, पदाधिकारी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अमित कोल्हे यांनी प्रास्ताविकात सांगितले की, आमदार विवेकभैया कोल्हे यांची विधान परिषदेवर मेरिटवर झालेली निवड ही संपूर्ण संजीवनी परिवारासाठी अभिमानाची बाब आहे. संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांनी युवकांना कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी




व्यासपीठ उपलब्ध करून दिले होते. त्याच विचारधारेतून विवेकभैया कोल्हे यांची वाटचाल सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला अधिक बळकटी देण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार विवेकभैया कोल्हे म्हणाले, माझे यश हे केवळ वैयक्तिक नसून संजीवनी परिवारातील प्रत्येक सदस्याचे यश आहे. शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संजीवनीने सातत्याने केले आहे. स्व. शंकरराव कोल्हे यांची शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टी मोठी होती. तळागाळापर्यंत शिक्षण पोहोचावे, ही त्यांची कायमची भूमिका होती.

ते पुढे म्हणाले की, संजीवनी संस्था ही केवळ शिक्षण देणारी नाही, तर विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारी संस्था आहे. येथे घडलेले विद्यार्थी आज जगभर विविध क्षेत्रांत कार्यरत असून ते या संस्थेच्या गुणवत्तेचे आणि संस्कारांचे प्रतीक आहेत. शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगताना त्यांनी उदाहरण देत स्पष्ट केले की, अभियंता किंवा डॉक्टरची चूक मर्यादित परिणाम करते, मात्र शिक्षकाची चूक संपूर्ण पिढीवर परिणाम करू शकते, म्हणून शिक्षकांचे कार्य अत्यंत जबाबदारीचे आहे.

आपण विधान परिषदेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रासाठी योगदान देण्याचा प्रयत्न करणार असल्याची ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

अध्यक्षीय मनोगतात नितिनदादा कोल्हे यांनी विवेकभैया कोल्हे यांच्या निवडीचे कौतुक करताना सांगितले की, ही निवड विकास, शिक्षण आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी कार्य करणाऱ्या नेतृत्वाची ओळख आहे. युवकांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारे नेतृत्व म्हणून त्यांची कारकीर्द घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी आमदार विवेकभैया कोल्हे यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी सार्वजनिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

### सौ. सविता मेहेत्रे यांची प्रवरा विद्यालय, इंदोरीच्या मुख्याध्यापकपदी नियुक्ती

● **अकोले । वीरभूमी-**

अकोले तालुक्यातील प्रवरा विद्यालय, इंदोरीच्या मुख्याध्यापकपदी सौ. सविता बाळासाहेब मेहेत्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



सौ. मेहेत्रे या सन १९९७ पासून अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या विविध शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी करंजी, इंदोरी, निमगाव पागा आणि समशेरपूर येथील माध्यमिक विद्यालयांमध्ये शिक्षक म्हणून उल्लेखनीय सेवा बजावली आहे. दीर्घ शैक्षणिक अनुभव आणि प्रशासकीय कौशल्याच्या बळावर त्यांची आता प्रवरा विद्यालय, इंदोरीच्या मुख्याध्यापकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यांच्या नियुक्तीबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सहसचिव मुकेश मूळे, खजिनदार ड. दीपलक्ष्मी म्हसे, विश्वस्त नंदकुमार झावरे, जी. डी. खानदेशे, जयंत वाघ, दीपक दरे, डॉ. सी. के. मोरे, जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारिणी सदस्य शरद देशमुख, अकोलेचे नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, अगस्ती साखर कारखान्याचे माजी संचालक बाळासाहेब ताजणे, वसंत बाळसराफ, अशोक गायकवाड, सोमनाथ बाळसराफ, इंदोरीच्या सरपंच सौ. मनिषा ठोंबाडे, रुंभोडीचे सरपंच रविंद्र मालुंजकर तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

सौ. सविता मेहेत्रे यांच्या नेतृत्वाखाली विद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता आणि सर्वांगीण विकास अधिक उंचावेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला आहे.

### स्व. निर्मलाताई काकडे स्मारक समितीची सहविचार सभेत पुतळा, चरित्रग्रंथ आणि जीवनपट निर्मितीचा महत्त्वपूर्ण निर्णय

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

आबासाहेब काकडे विद्यालय, शेवगावच्या संस्थापक मुख्याध्यापिका तथा शिक्षण क्षेत्रातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व स्व. निर्मलाताई काकडे यांच्या स्मृती जतन व संवर्धनासाठी स्थापन करण्यात आलेल्या स्व. निर्मलाताई काकडे स्मारक समितीची महत्त्वपूर्ण सहविचार सभा राष्ट्रीय पाठशाळा हायस्कूल, अहिल्यानगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.



सभेच्या प्रारंभी अमरावती येथे होणाऱ्या चौथ्या 'स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदी निवड झालेल्याबद्दल सेवानिवृत्त सनदी अधिकारी, कवी, लेखक आणि शब्दगंधचे माजी संमेलनाध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम भापकर यांचा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या साहित्यिक, शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

बैठकीत स्व. निर्मलाताई काकडे यांच्या कार्याचा गौरवशाली वारसा भावी पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांच्या स्मरणार्थ भव्य पुतळा उभारणे, त्यांच्या जीवनावर आधारित चरित्रग्रंथ प्रकाशित करणे तसेच त्यांच्या जीवनकार्यावर चित्रपट निर्मिती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. निर्मलाताई काकडे यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी कार्य, विचार आणि संघर्षमय वाटचाल समाजासमोर यावी यासाठी त्यांच्या जीवनाशी संबंधित लेख, आठवणी, अनुभव, संस्मरणे आणि दुर्मीळ छायाचित्रांचे संकलन करण्याचे ठरविण्यात आले.

चरित्रग्रंथ प्रकाशनाच्या दृष्टीने स्व. निर्मलाताई काकडे यांच्याशी संबंधित आठवणी, लेख, अनुभव आणि छायाचित्रे जून २०२६ अखेर स्मारक समितीकडे सादर करण्याचे आवाहन साहित्यप्रेमी, सहकारी, नातेवाईक, माजी विद्यार्थी आणि नागरिकांना करण्यात आले.

या सभेस डॉ. पुरुषोत्तम भापकर, कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे प्रमुख ॲड. डॉ. विद्याधर काकडे, सौ. हर्षदाताई काकडे, ॲड. सुभाष भोर, प्रा. रामराजे लाखे, सौ. हेमलता लाखे, भगवान राऊत, बापुसाहेब भोसले, डॉ. लक्ष्मण बिटाळ, अशोक नवल, जयराम सुडके यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# वडझिरे परिसरातील कथित घुसखोरीची एटीएसमार्फत चौकशी करावी

## आमदार संग्राम जगताप । पारनेरमध्ये सकल हिंदू समाजाचा रास्ता रोको; प्रशासनाकडे तातडीच्या कारवाईची मागणी

● **निघोज । वीरभूमी-**

पारनेर तालुक्यातील वडझिरे व परिसरातील गावांमध्ये काही कथित बांगलादेशी नागरिक आणि रोहिंग्या वास्तव्यास असल्याचा आरोप करत त्यांच्या वास्तव्याची सखोल चौकशी दहशतवादविरोधी पथक (एटीएस) मार्फत करण्यात यावी, अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांनी केली आहे. देवी भोयरे फाटा येथे आयोजित रास्ता रोको आंदोलनात सहभागी होत त्यांनी प्रशासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील वडझिरे आणि परिसरात वाढत्या कथित अवैध घुसखोरीच्या मुद्द्यावरून स्थानिक नागरिकांमध्ये असंतोष असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर सोमवारी सकल हिंदू समाजाच्या वतीने पारनेर-बेल्ह-आळेफाटा मार्गावरील देवी भोयरे फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात आमदार संग्राम जगताप व सागर बेग सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान आमदार जगताप यांनी प्रशासनाकडे मागणी केली की, परिसरात वास्तव्यास असलेल्या संशयित व्यक्तींची ओळख, कागदपत्रे आणि वास्तव्याची कायदेशीरता याबाबत सखोल चौकशी करण्यात यावी. स्थानिक नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, असेही त्यांनी नमूद केले.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, परिसरात बाहेरून आलेल्या काही व्यक्तींबाबत नागरिकांमध्ये शंका आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने वस्तुस्थिती स्पष्ट करून नागरिकांचा विश्वास वाढवावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.



या आंदोलनात महिला, युवक आणि विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनामुळे पारनेर-बेल्ह-आळेफाटा मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रशासनाने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

आपल्या भाषणात आमदार संग्राम जगताप यांनी प्रशासनाने तातडीने चौकशी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली. स्थानिक नागरिकांच्या भावना आणि तक्रारी गांभीर्याने घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संबंधित प्रकरणाची चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

**त्वरित चौकशीची मागणी**

■ आंदोलनादरम्यान आमदार संग्राम जगताप यांनी संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून पात्र यंत्रणांमार्फत आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली. नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या शंका व अस्वस्थतेचे निरसन प्रशासनाने तातडीने करावे, असेही त्यांनी नमूद केले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात १० जूनपासून बीडहून लाँग मार्च

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

महाराष्ट्र सरकार आरक्षणाच्या मुद्द्यावरून विविध समाजघटकांमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम करत असून, समर्थक जातींना एकमेकांविरुद्ध उभे करण्याचे षडयंत्र राबवत आहे. समाजातील विविध प्रश्नांपासून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी जाती–जातींमध्ये संघर्ष, दंगली आणि वाद निर्माण करण्याचे कारस्थान सरकारकडून सुरू असल्याचा गंभीर आरोप अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचे अभ्यासक डॉ. सिद्धार्थ शिनगारे यांनी केला. अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी १० जूनपासून बीड येथून निघणाऱ्या राज्यव्यापी लाँग मार्च १५ जून रोजी अहिल्यानगर शहरात येणार आहे. त्याच्या नियोजनार्थ फुले–शाहू–आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. विजय भांबळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत एन. एम. पवळे, पी. पी. खंडागळे, निवृत्ती आरु, राजीव साळवे, सुहास धीवर, संजय कांबळे, धम्मपाल विद्याधर यांच्यासह विविध संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत बोलताना डॉ. शिनगारे यांनी सरकारच्या आरक्षण धोरणावर टीका करताना सांगितले की, एससी उपवर्गीकरणाचा मुद्दा पुढे आलेला असताना त्यामधील ५८ जाती या उपवर्गीकरणाच्या विरोधात आहे. एकाच जातीची मागणी असून, त्यामधील निम्मे लोक देखील याला विरोध दर्शवित आहे. आरक्षणावरुन विविध जातींना एकमेकांविरोधात उभे केले जात आहे. हे सर्व कारस्थान सरकारपक्षातील व्यक्तींकडूनच राबविले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

## विविध मागण्यांसाठी समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे अन्नत्याग आंदोलन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेच्या वतीने जिल्हा परिषद कार्यालयासमोर एकदिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. यासोबतच समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी ऑनलाइन काम बंद आंदोलनही सुरू केले आहे. संघटनेच्या वतीने तीन महिन्यांचे थकीत वेतन तातडीने अदा करावे, पाच महिन्यांपासून प्रलंबित असलेला कामावर आधारित मोबदला द्यावा, जिल्हा अंतर्गत बदल्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात तसेच कोविड काळातील फरकाची रक्कम त्वरित अदा करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. शैलेश पवार, उपजिल्हाध्यक्ष सूर्यकांत यादव, सचिव अक्षय जवरे, डॉ. प्रीती सैदोरे, डॉ. नूतन कडलग, डॉ. शितल चौधरी, प्रवीण राठोड, डॉ योगिता शेजाळ, डॉ सविता कुटे, डॉ वैष्णवी गोपालघरे,डॉ. दिनेश भोज, अक्षय अनाप, राम भवानी, विजय शिंदे, नाईकवाडे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व समुदाय आरोग्य अधिकारी उपस्थित होते. संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे डिसेंबर, जानेवारी, मार्च आणि एप्रिल महिन्यांचे कामावर आधारित मोबदला तसेच मार्च आणि एप्रिल महिन्यांचे मूलभूत मानधन अद्याप प्रलंबित आहे. शासनाकडून पगार वितरणासाठी निधी उपलब्ध होऊनही वेतन वितरणाबाबत राज्य शासनाकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. जिल्हा परिषद अहिल्यानगरकडून वेतन वितरणासंदर्भातील आवश्यक माहिती राज्य शासनाकडे पाठविण्यात आली असतानाही अद्याप वेतन अदा करण्यात आलेले नाही.

# स्व. बाळासाहेब विखे यांचे दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करावे

### अण्णा हजारे । राळेगणसिद्धीत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतली सदिच्छा भेट

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

स्व. बाळासाहेब विखे पाटील यांनी पाहिलेले दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न त्यांचे सुपुत्र तथा राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या कारकिर्दीत साकार व्हावे, अशी अपेक्षा ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांनी व्यक्त केली.

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी रविवारी राळेगणसिद्धी येथे जाऊन पद्मभूषण अण्णा हजारे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी झालेल्या अनौपचारिक चर्चेदरम्यान अण्णा हजारे यांनी ही अपेक्षा व्यक्त केली. ना. विखे पाटील यांनी अण्णा हजारे यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा समन्वयक विनायकराव देशमुख उपस्थित होते.




या भेटीदरम्यान मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा विभागामार्फत राज्यात सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची तसेच महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या योजना आणि उपक्रमांची माहिती अण्णा हजारे यांना दिली.

शेतकरी हिताला प्राधान्य देत जलसंपदा विभागामार्फत विविध निर्णय घेतले जात असून कृष्णा व गोदावरी खोरे विकास महामंडळाच्या अखत्यारित अनेक नवीन प्रकल्प सुरू करण्यात येत आहेत. तसेच धरणांमधील गाळ काढण्याचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले असून त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील मुळा धरणाचाही समावेश करण्यात आल्याची माहिती ना. विखे पाटील यांनी दिली.

राज्यातील नदीजोड प्रकल्पांना जलसंपदा विभागाने विशेष प्राधान्य दिले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या प्रकल्पांच्या अंमलबजावणीचे काम गतीने सुरू असल्याबद्दल अण्णा हजारे यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी बोलताना अण्णा हजारे म्हणाले, स्व. खासदार बाळासाहेब विखे पाटील यांनी अनेक वर्षांपूर्वी महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याची संकल्पना मांडली होती. या संदर्भात त्यांनी तज्ज्ञांच्या मदतीने महत्त्वपूर्ण आराखडाही तयार केला होता. विशेषतः कोकणातील अतिरिक्त पाणी घाटमाथ्यावर आणणे आणि नदीजोड प्रकल्प राबविणे यासंदर्भात त्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पना होत्या. त्या कल्पना प्रत्यक्षात आणून मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्व. बाळासाहेब विखे पाटील यांचे स्वप्न पूर्ण करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## सुशिलामाई काळे महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची शासकीय सेवेत निवड


**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोळपेवाडी येथील कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीच्या सौ. सुशिलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांची शासकीय सेवेत–सैन्य दल आणि पोलीस दलात–निवड झाली आहे. यामध्ये दोन विद्यार्थिनींचा समावेश असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे, अशी माहिती महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. सौ. विजया गुरसळ यांनी दिली.

महाविद्यालयात मिळणाऱ्या दर्जेदार शिक्षणासोबतच विविध क्षेत्रांत करिअर घडविण्यासाठी दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या मार्गदर्शनाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी आपल्या कष्टांचे रूपांतर यशात केले आहे.

विद्यार्थी रमेश घोडेराव याची भारतीय सैन्य दलात निवड झाली असून त्याने देशसेवेचे स्वप्न साकार केले आहे. तसेच विद्यार्थिनी कु. वृषाली वाघ हिची नागपूर ग्रामीण पोलीस दलात, तर कु. आरती कलोर हिची मुंबई पोलीस दलात निवड झाली आहे. या दोन्ही विद्यार्थिनींच्या खाकी वर्दीतील सेवेच्या स्वप्नाला यश मिळाले आहे.

या विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे चेअरमन तथा आमदार अशोकराव काळे, विश्वस्त आमदार आशुतोष काळे, सचिव सौ. चैतालीताई काळे, उपाध्यक्ष छबुराव आव्हाड, सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य, संस्था निरीक्षक नारायण बारे तसेच प्र. प्राचार्या डॉ. सौ. विजया गुरसळ यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळविलेले हे यश केवळ महाविद्यालयाचा लौकिक वाढवणारे नसून परिसरातील तरुण–तरुणींना शासकीय सेवा आणि देशसेवेकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरणादायी ठरणारे आहे.

## थोर समाजसेवक बाबा आढाव यांची जयंती सांगवी सुर्या येथे उत्साहात साजरी

**● पारनेर । वीरभूमी–**

कष्टकरी, हमाल आणि असंघटित कामगारांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांची जयंती पारनेर तालुक्यातील त्यांचे मूळ गाव सांगवी सुर्या येथे विविध सामाजिक उपक्रमांनी आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. पारनेरचे उपसरपंच विजय डोळ यांच्या विशेष पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी सांगवी सुर्या येथील ज्येष्ठ नागरिक चंदर आढाव यांच्या हस्ते डॉ. बाबा आढाव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आणि ग्रामस्थांनी त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

डॉ. बाबा आढाव यांनी 'एक गाव, एक पाणवठा' या चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रात सामाजिक समतेचा प्रभावी संदेश दिला. त्यांच्या या पुरोगामी विचारांचा वारसा त्यांच्या जन्मभूमी असलेल्या सांगवी सुर्या गावाने आजही जपला आहे, याचा अभिमान ग्रामस्थांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना उपसरपंच विजय डोळ म्हणाले, डॉ. बाबा आढाव यांचे विचार आणि त्यांनी कष्टकरी, हमाल व असंघटित कामगारांसाठी केलेले कार्य नव्या पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांच्या जन्मगावी हा सामाजिक वारसा अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत.

या जयंती सोहळ्यास गावातील नागरिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये भास्कर आढाव, कोंडीभाऊ आढाव, ज्ञानदेव आढाव, संतोष आढाव, धोंडीभाऊ कोठावळे, अशोक कोठावळे, रघुनाथ कोठावळे, नवनाथ कोठावळे, भास्कर कोठावळे, प्रकाश कोठावळे, दत्तात्रय म्हस्के, जयवंत म्हस्के, विठ्ठल म्हस्के, अशोक पंधारे, मोहन झंजाड, उत्तम नगरे, अंकुश नगरे, नारायण साळवे, दादाभाऊ साळवे, मनोहर गायकवाड, योगेश भालेकर आणि बबन साठे यांचा समावेश होता.

# ऊस लागवडीत उत्कृष्ट कामगिरीबद्दल सरपंच पोपटराव वारुळे यांना 'महाधन योद्धा पुरस्कार'

### वैज्ञानिक पीक पोषण व संतुलित खत व्यवस्थापनातून साधली उल्लेखनीय उत्पादन क्षमता; महाधन ॲग्रीटेक लिमिटेडकडून गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

प्रगत शेती आणि वैज्ञानिक पीक पोषण पद्धतींमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने महाधन ॲग्रीटेक लिमिटेड (MAL) तर्फे अहिल्यानगर जिल्ह्यातील पोखर्डी येथील सरपंच पोपटराव अंतु वारुळे यांना ऊस लागवडीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रतिष्ठेचा 'महाधन योद्धा पुरस्कार–२०२६' प्रदान करण्यात आला.

नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर येथे आयोजित सत्कार समारंभात शेतकरी, ग्रामस्थ, कृषी क्षेत्रातील मान्यवर आणि कंपनीचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाधन योद्धा पुरस्काराद्वारे संतुलित पीक पोषण, वैज्ञानिक शेती पद्धती आणि कार्यक्षम अन्नद्रव्य व्यवस्थापनाच्या माध्यमातून उल्लेखनीय उत्पादनक्षमता साध्य करणाऱ्या प्रगत शेतकऱ्यांचा गौरव केला जातो. हा सन्मान पीक उत्पादनक्षमता आणि नफा वाढविण्यासाठी आधुनिक पीक पोषण उपाययोजनांचे वाढते महत्त्व अधोरेखित करतो.

महाधन ॲग्रीटेक लिमिटेडने 'महाधन' या प्रमुख ब्रँडअंतर्गत भारतीय शेतकऱ्यांना पिकानुसार पोषण उपाय उपलब्ध करून देण्यात अग्रणी भूमिका बजावली आहे. प्रगत खत उत्पादने आणि शेतकरी–केंद्रित नवकल्पनांच्या माध्यमातून कंपनी विविध पिकांमध्ये शाश्वत कृषी विकासाला चालना देत आहे.

यावेळी बोलताना पुरस्कार विजेते सरपंच पोपटराव वारुळे म्हणाले, महाधनच्या क्रॉपटेक ९:२४:२४ मुळे माझ्या ऊस शेतीत उल्लेखनीय परिणाम दिसून आले. उसाची वाढ अधिक मजबूत झाली, कांड्यांची जाडी सुधारली, कांड्यामधील अंतर वाढले तसेच फुटवे लवकर आणि जोमाने निघाले. गाळपयोग्य उसांची संख्या, पिकातील एकसारखेपणा आणि एकूण उत्पादनक्षमता वाढल्याने माझे उत्पन्न वाढले असून वैज्ञानिक शेती पद्धतीवरील माझा विश्वास अधिक दृढ झाला आहे.



या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया देताना महाधन ॲग्रीटेक लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी नरेश देशमुख म्हणाले, महाधन योद्धा पुरस्कार हा प्रगत आणि विज्ञानाधारित कृषी पद्धती स्वीकारणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. सरपंच पोपटराव वारुळे यांच्यासारखे शेतकरी संतुलित पीक पोषणामुळे उत्पादनक्षमता, नफा आणि शाश्वतता यामध्ये सकारात्मक बदल कसा घडवता येतो, हे दाखवून देतात. पिकांच्या गरजेनुसार नाविन्यपूर्ण पोषण उपाय शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.

कंपनीची पिकानुसार विकसित करण्यात आलेली पोषण उत्पादने विविध जमिनी व पिकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आली आहेत. क्रॉपटेकसह महाधनची प्रगत उत्पादने मुख्य, दुय्यम आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचे संतुलित मिश्रण उपलब्ध करून देतात. त्यामुळे अन्नद्रव्यांचे शोषण सुधारून पिकांची कार्यक्षमता वाढते. या उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांना उत्पादनक्षमता वाढविणे, खतांचा कार्यक्षम वापर करणे तसेच पिकांची गुणवत्ता आणि जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे.

महाधन योद्धा पुरस्काराच्या माध्यमातून महाधन ॲग्रीटेक लिमिटेड आधुनिक कृषी पद्धतींना प्रोत्साहन देण्याबरोबरच ज्ञान, नवकल्पना आणि समर्पणाच्या जोरावर भारतीय शेतीत सकारात्मक परिवर्तन घडविणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करीत आहे.

### महाधन ॲग्रीटेक लिमिटेड विषयी

महाधन ॲग्रीटेक लिमिटेड ही भारतातील नाविन्यपूर्ण खत उपायांची अग्रगण्य कंपनी आहे. 'महाधन' या प्रमुख ब्रँडअंतर्गत कंपनी एनपी, एनपीके, विद्राव्य खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये आणि विशेष पीक पोषण उत्पादने यांचा विस्तृत पोर्टफोलिओ उपलब्ध करून देते. देशातील प्रमुख कृषी बाजारपेठांमध्ये मजबूत उपस्थितीसह कंपनी शेतकऱ्यांची उत्पादनक्षमता, जमिनीचे आरोग्य आणि दीर्घकालीन शाश्वतता सुधारण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या स्मारकामुळे पुणतांब्याच्या वैभवात भर पडणार

## आ. आशुतोष काळे । पुणतांबा येथे अहिल्यादेवी होळकर स्मारकाचे भूमिपूजन; घाट संवर्धनासाठी साडेतीन कोटींचा प्रस्ताव

**● कोपरगाव । वीरभूमी–** लोककल्याणकारी राज्यकारभाराचे आदर्श प्रतीक असलेल्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी पुणतांबा परिसरासह महाराष्ट्रात शेकडो मंदिरे, विहिरी, बारवा आणि गोदावरी नदीवरील घाट उभारून समाजजीवन समृद्ध केले. दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या पुणतांबा गावात त्यांच्या भव्य स्मारकाच्या उभारणीमुळे गावाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवात अधिकची भर पडणार असल्याचे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

### घाट संवर्धनासाठी निधी कमी पडू देणार नाही : पालकमंत्री विखे पाटील

■ मागील महिन्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेली 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा यशस्वी ठरली असून त्याच संकल्पनेतून पुणतांबा येथील अहिल्यादेवींनी बांधलेल्या ऐतिहासिक घाटाचे संवर्धन करण्यात येणार आहे. ग्रामस्थांच्या पुढाकारातून अहिल्यादेवींचा इतिहास जपण्याचे कार्य होत असल्याचा आनंद व्यक्त करत पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, या ऐतिहासिक घाटाच्या संवर्धनासाठी आमदार आशुतोष काळे यांनी केलेल्या मागणीनुसार निधी कमी पडू देणार नाही.

प्रजाहितदक्ष पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त पुणतांबा येथे लोकसहभागातून उभारण्यात येणाऱ्या भव्य स्मारकाचे भूमिपूजन अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते आणि आमदार आशुतोष काळे यांच्या उपस्थितीत रविवारी पार पडले. यावेळी ते बोलत होते.

आमदार आशुतोष काळे म्हणाले की, अध्यात्म, संस्कृती, संघर्ष आणि इतिहास यांचा सुंदर संगम पुणतांब्याच्या पवित्र भूमीत पाहायला मिळतो. अनेक सामाजिक आणि ऐतिहासिक चळवळींची सुरुवात या गावातून झाली असून, २०१७ मधील राज्यव्यापी शेतकरी आंदोलन हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी पुणतांबा परिसरात उभारलेल्या मंदिरांचे आणि गोदावरी नदीवरील ऐतिहासिक घाटांचे संवर्धन करण्यासाठी सुमारे साडेतीन कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पामध्ये अहिल्याघाटावरील २६ भव्य दगडी पायऱ्या, आकर्षक गोलाकार बुरूज, प्राचीन महादेव मंदिर, कार्तिकस्वामी मंदिर आणि संत चांगदेव महाराज समाधी परिसराचे जतन व संवर्धन करण्यात येणार आहे. तसेच भाविक, अभ्यासक आणि पर्यटकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या कामांसाठी पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील निधी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगत आमदार काळे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या वारशाचे जतन होण्यास यामुळे मोठी मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

नदी संवर्धन योजनेअंतर्गत ११ कोटी रुपयांच्या विकासकामांचा प्रस्ताव पर्यावरण मंत्रालयाकडे सादर करण्यात आला असून हे दोन्ही प्रस्ताव लवकर मंजूर करण्यासाठी सहकार्य करण्याची विनंतीही त्यांनी पालकमंत्र्यांकडे केली.



यावेळी पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते अधिक मासानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी घाटावर सामूहिक गंगा आरती करण्यात आली. मंत्रोच्चार, दीपप्रज्वलन आणि हरिनामाच्या गजरात झालेल्या या गंगा आरतीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

कार्यक्रमास गौतम सहकारी बँकेचे माजी चेअरमन बाबासाहेब कोते, माजी सरपंच मुरलीधर थोरात, डॉ. धनंजय धनवटे, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र लहारे, सौ. वैजयंती धनवटे, संध्या थोरात, शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष धनंजय जाधव, आण्णासाहेब कोते, संदीप लहारे, दिलीप चौधरी, जळगावचे सरपंच शिवाजीराव साबदे, शामसुंदर धनवटे, नानासाहेब काळवाघे, भाऊसाहेब जाधव, दत्तात्रय धनवटे, विजय धनवटे, चांगदेव धनवटे, मच्छिंद्र चौधरी, बबनराव बरवंट, महेश औताडे, सौ. संगीता भोरकडे, शांतीलाल भाटी, राहुल धनवटे, दिनेश जगताप, शिवाजीराव जगताप, राजेंद्र धनवटे, बाळासाहेब भोरकडे, दीपक गायकवाड, शिवाजी प्रधान, सुनील थोरात, विलास पेटकर, श्याम जगताप, रामकृष्ण चव्हाण, अरुण बाबरे, पत्रकार अजय जोशी, संजय जोगदंड, मनोज गुजराथी, किरण नाईक यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीचे पदाधिकारी, महायुतीचे कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संजीवनी अकॅडमीला प्री-सुब्रतो फुटबॉल स्पर्धेत उपविजेतेपद

**● कोपरगाव । वीरभूमी–** संजीवनी अकॅडमीच्या १७ वर्षांखालील मुलांच्या फुटबॉल संघाने साऊथ झोन (सेकंड) सीबीएसई प्री–सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धा २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले आहे. कठोर परिश्रम, शिस्तबद्ध खेळ, जिद्द आणि उत्कृष्ट सांघिक समन्वयाच्या जोरावर संघाने हे यश मिळवले. केरळ, महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक या चार राज्यांतील बलाढ्य संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.



स्पर्धेच्या साखळी फेरीत संजीवनी अकॅडमीने सेंट्रल रेल्वे स्कूल, कल्याणचा २–० असा पराभव करत विजयी सुरुवात केली. उपांत्यपूर्व फेरीत समता इंटरनॅशनल स्कूलवर ३–० असा दणदणीत विजय मिळवत संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

उपांत्य फेरीत केरळच्या डॉन बॉस्को स्कूलविरुद्ध अत्यंत चुरशीचा सामना झाला. निर्धारित वेळेत सामना १–१ असा बरोबरीत राहिल्यानंतर निकाल पेनल्टी शूटआऊटवर गेला. या थरारक सामन्यात संजीवनी अकॅडमीने ४–३ असा विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला.

अंतिम सामन्यात पुण्याच्या आर्मी पब्लिक स्कूलविरुद्ध झालेल्या सामन्यात खेळाडूंनी अत्यंत जिद्दीने लढत दिली. अखेरीस संजीवनी अकॅडमीला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. ही स्पर्धा समता इंटरनॅशनल स्कूल येथे पार पडली.

संघात आर्यन गौतम सोनवणे, ईशान इम्रान सय्यद (गोलरक्षक), विहान रोहित वाघ (कर्णधार), सात्विक सुभाष औताडे, नैतिक सरोज, गगनराजे सतीश जाधव, निर्भय रुपेश पारख, आरुष संदीप शिंदे, प्रत्यूष दीपक जाधव, विश्वजित राजेंद्र मांजरे, श्रेयस लक्ष्मण भड आणि शौर्य वैभव घुले या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रेक्षकांची मने जिंकली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, व्यवस्थापकीय संचालिका डॉ. मनाली कोल्हे, डिरेक्टर ऑफ ऑडिट सुंदरी सुब्रमण्यम, प्राचार्या अनुश्रीता सिंह यांनी खेळाडूंसह क्रीडा विभाग प्रमुख विरुपक्ष रेड्डी आणि प्रशिक्षक मोती कुमार यांचे अभिनंदन केले.

# शेवगावातील अतिक्रमणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी पालकमंत्री व आमदारांना शिष्टमंडळ भेटणार : अरुण लांडे

**● शेवगाव । वीरभूमी–** शेवगाव शहरात मोठ्या प्रमाणात राबविण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे सर्वसामान्य व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले असून अनेक टपरीधारक व लघु व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे. या व्यावसायिकांना दिलासा देण्यासाठी रविवारी रात्री ज्येष्ठ नेते अरुण पाटील लांडे यांच्या संपर्क कार्यालयात शहरातील सामाजिक कार्यकर्ते व अतिक्रमणग्रस्त व्यावसायिकांची बैठक पार पडली.

या बैठकीत येत्या दोन–तीन दिवसांत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार मोनिकाताई राजळे यांची भेट घेण्यासाठी शिष्टमंडळ पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. या शिष्टमंडळामार्फत सर्वसामान्य टपरीधारक व लघु व्यावसायिकांच्या पुनर्वसनासाठी व्यापारी संकुल उभारण्याची आग्रही मागणी करण्यात येणार आहे.

बैठकीस सामाजिक कार्यकर्ते डॉ. नीरज लांडे पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्ता फुंदे, रवी सुरोसे, किरण काथवटे, चंद्रकांत कर्डक, बापू धनवडे, गणेश शहाणे, गणेश रणखांब, मुन्ना बोरुडे यांच्यासह विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी तसेच अतिक्रमणग्रस्त टपरीधारक व्यावसायिक उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषद शाळेजवळ व्यापारी संकुल उभारण्याचा तत्कालीन राजकीय कारणांमुळे प्रलंबित राहिलेला प्रस्ताव नव्याने मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली. तसेच कोरोनेशन हॉल व प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील जागेवर व्यापारी संकुल उभारण्याचा प्रश्न प्राधान्याने सोडवून अतिक्रमणग्रस्तांचे पुनर्वसन करावे, अशी मागणी करण्यात आली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार मोनिकाताई राजळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या नेतृत्वाखाली लवकरात लवकर व्यापारी संकुल उभारण्याकरिता एकदिलाने प्रयत्न करण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. अशा व्यापारी संकुलांच्या उभारणीमुळे जिल्हा परिषदेच्या उत्पन्नातही भर पडेल, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# रामगिरी महाराजांचे कार्य अनुकरणीय; भगवानगड येळेश्वर संस्थांच्या पाठीशी

## महंत डॉ. नामदेव शास्त्री । पंढरपुरातील भव्य मठाचे लोकार्पण; अखंड हरिनाम सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न

**● पाथर्डी । वीरभूमी–** धर्मस्थाने उभी करणे ही सोपी गोष्ट नाही. कष्टकरी भाविकांच्या योगदानाच्या जोरावर येळेश्वर संस्थांचे मठाधिपती रामगिरी महाराज यांनी अशक्यप्राय गोष्ट शक्य करून दाखवली आहे. धन, कण आणि क्षण यांचे संकलन करत स्वतः ला मोठे न समजता जमिनीवर राहून गगनाला गवसणी घालण्याची त्यांची वाटचाल कौतुकास्पद आहे. भगवानगड सर्व शक्तीनिशी येळेश्वर संस्थांच्या पाठीशी उभा आहे, असे गौरवोद्गार भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री यांनी काढले.

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येळेश्वर संस्थानच्या वतीने अधिक मासानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता समारंभात तसेच नव्याने बांधण्यात आलेल्या भव्य मठाच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते.

गेल्या आठ दिवसांपासून येळी पंचक्रोशीसह राज्यातील सुमारे ६५ गावांतील हजारो भाविकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसरात आषाढी वारीचे वातावरण निर्माण झाले होते. शनिवारी सकाळी टाळ–मृदंगाच्या गजरात अत्यंत भव्य आणि प्रेक्षणीय ग्रामप्रदक्षिणा काढण्यात आली. प्रदक्षिणा मार्गावर ग्रामस्थ व भाविकांनी उत्स्फूर्तपणे पुष्पवृष्टी करून स्वागत केले. भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री यांच्या सहभागामुळे वातावरण अधिकच भक्तिमय आणि चैतन्यमय झाले.

लोकसहभागातून लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेला तीन मजली भव्य मठ रामगिरी महाराज यांच्या पुढाकारातून पूर्णत्वास आला आहे. आगामी काळात आळंदी येथेही अशाच स्वरूपाचा मठ उभारण्याचा संकल्प येळी व परिसरातील भाविकांनी व्यक्त केला आहे.

ग्रामप्रदक्षिणा सोहळ्यादरम्यान वारकरी भाविकांनी चंद्रभागा नदीच्या वाळवंटात सादर केलेले उभे व गोल रिंगण उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरले. वारकऱ्यांची शिस्त, भक्तिभाव आणि तल्लीनता पाहून खऱ्या उपासकांचे दर्शन घडल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

अधिक मासानिमित्त आयोजित या सप्ताहाचे यंदाचे रौप्यमहोत्सवी वर्ष होते. यापूर्वी काशी, पैठण, त्र्यंबकेश्वर, आळंदी, देहू यांसारख्या विविध तीर्थक्षेत्रांमध्येही अशा सप्ताहांचे आयोजन करण्यात आले होते. काल्याच्या कीर्तनासह झालेल्या सांगता समारंभाला तालुक्यासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. संपूर्ण सप्ताह अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला.




यावेळी बोलताना डॉ. नामदेव शास्त्री म्हणाले, कोणताही आधार नसताना मान–अपमान सहन करत, जीवनातील अमूल्य वेळ खर्च करून आणि स्वकर्तृत्वावर भाविकांसाठी सेवा कार्य करणे सोपे नसते. रामगिरी महाराजांचे कार्य पाहून इतर महाराजांनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. मनात कर्तृत्व, अंगी विनम्रता आणि सतत कर्म करण्याची वृत्ती असेल तर किती मोठे कार्य उभे राहू शकते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे रामगिरी महाराज. जातीभेद आणि मानापमान विसरून लोकांसाठी कार्य करणे हेच साधूंचे खरे कर्तव्य आहे. येळी आणि पंचक्रोशीतील सकारात्मक बदल ही त्यांच्या कार्याचीच पावती आहे.

या कार्यक्रमात गावचे सुपुत्र तथा पाथर्डी तालुक्याचे शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजी कराड यांची शिक्षक बँकेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तसेच राज्य शासनाकडून विशेष गौरव प्राप्त झालेले प्रशांत गोरक्ष कराड यांचा रामगिरी महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी सरपंच तथा ज्येष्ठ नेते संजय बडे यांनी केले, तर आभार शिक्षक नेते राजेंद्र जायभाय यांनी मानले.